# राष्ट्रीय एकात्मता व राष्ट्र बांधणीत गांधीजींचे योगदान

**सुखदेव एस. उंदरे,** सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र अधिविभाग , शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

जवळपास पाच हजार वर्षांचा सांस्कृतिक वारसा सांगणारा भारतीय समाज १९ व्या शतकापर्यंत अनेक साम्राज्य, राजे, संस्थानिकांच्या नेतृत्वाने वाटचाल करीत होता.साधारणतः दीडशे ते पावणेदोनशे वर्षे वसाहतीक गुलामीच्या दिर्घ कालखंडानंतर गांधीजींनी १९ व्या शतकाच्या मध्यात ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधात भारतीय जन मानसाला एकात्मतेच्या सूत्रात बांधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हाती घेतले.भारतीय उपमहाद्वीपाचा प्रचंड भू-विस्तार, अफाट लोकसंख्या, भाषिक, धार्मिक, प्रांतीय, वांशिक, प्रादेशिक व सांस्कृतिक विविधतेने प्रचूर असलेला भारतीय समाज आहे.जवळपास ५६५ छोट्या-मोठ्या संस्थानांमधून विभागलेला भारत एकात्मतेच्या सूत्रात बांधून व त्यामध्ये विविधतेला टिकवून स्वतंत्र भारताची विभागणी करण्याचे दिवास्वप्न प्रत्यक्षात उत्तरविण्यासाठी गांधींजींनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या श्वासापर्यंत प्रयत्न केले.गांधीजींच्या या प्रयत्नांच्या फलस्वरूप आज उभा असलेला धर्मनिरपेक्ष समाजवादी गणराज्य भारत आपले २१ व्या शतकातील वाटचाल करीत आहे.भारताची अशी वाटचाल सुरू असणे म्हणजे जागतिक समुदायासाठी आश्चर्यच म्हणावे लागेल.भारताच्या उभारणीसाठी अनेक महत्त्वपूर्ण भारतीय व्यक्तींनी आपले जीवन अर्पण केले.या सर्वांच्या त्यागाबरोबरच गांधींचे योगदान विशेषत्वाने समोर येते अजूनही भारताच्या एकात्मतेला वेळोवेळी अनेक संकुचित घटकांनी तळे देऊन भारताच्या अखंडतेला अस्थिर करण्याचे प्रयत्न केले. या पार्श्वभूमीवर सत्ता विक्रेंदीकरण व स्वराज्य संकल्पनेतून ग्रामांची पुनर्रचना संबंधी गांधींनी जे कल्पकतेने व समर्पकतेने एकात्म भारत उभारणीसाठी जे योगदान दिले. या विषयीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण प्रस्तुत शोध पत्रातून करण्यात आले आहे.

भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. गांधीजींच्या मते, ‘भारताचे दर्शन मुठभर शहरांमध्ये नव्हे त्याच्या सात लाख खेड्यांमध्ये’ घडते.[१]गांधीजींना अपेक्षित असणारे आदर्श राज्य सत्तेच्या विकेंद्रीकरणातुनच साकार होवू शकते. सत्ताविकेंद्रीकरणाचे महत्त्व गांधीजी जाणत होते. त्यांच्या मते, खेड्यांचा विकास झाला तरच समाज व राष्ट्राचा विकास शक्य आहे.सत्ता प्रत्येक गावाच्या व्यक्तीपर्यंत पोहोचली पाहिजेतेव्हाच वास्तविक अर्थाने ग्रामराज्य व रामराज्य स्थापित होईल. गांधीजींच्या याच विचारांची प्रेरणा मिळून भारतीय राज्यघटनेत राज्य ग्राम पंचायत करिता पाऊले उचलेल आणि त्यांना शक्ती व अधिकार प्रदान करेल कि ज्यायोगे ग्राम पंचायत ही एक स्वशासनाचा एक घटक म्हणून कार्य करू शकेल.[२]१९९३ च्या ७३ व७४च्या घटना दुरुस्तीने गांधीजींच्या पंचायतराज संबंधीच्या विचाराला प्रत्यक्ष साकारून लोकांना सत्तेत सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला गेला.त्याचबरोबर या पंचायत राजमूळे राजकारणात महिलांचा सहभाग वाढला.महिलांना पंचायतराज व्यवस्थेत३३ टक्के व नंतरच्या काळात महाराष्ट्रासह जवळपास वीस घटकराज्यांकडून ५०टक्के जागा राखून ठेवण्याचे धोरण राबविण्यातआले.त्यामुळे ग्रामीण नेतृत्व उदयाला आले.लोकांना राजकारणाविषयीची ओळख पंचायत राजमुळे होत आहे.परंतु याचबरोबर राजकीय आत्मनिर्भरता तेव्हाच शक्य आहे, जेव्हा गांधीजींच्या विचारानुसार लघुउद्योग व कुटीर उद्योग यांना प्रोत्साहन व संरक्षणदिले जाईल.एकविसाव्या शतकात राजकारण व धर्म एक दुसऱ्यांशी पूरक बनले आहेत. धर्माच्या नावाखाली अनेक गोष्टी केल्या जात आहेत. मंदिर आणि मस्जीदच्या नावाखाली एकमेकांविरुद्ध धार्मिक, जातीय दंगली व हिंसाचार केले जात आहेत.अशा परिस्थितीत सांस्कृतिक एकरूपता कमी होत चालली आहे. ही अवस्था अशीच सुरू राहिली तर देशाचे लहान लहान तुकडे होतील.अशा लहान लहान तुकड्यात देश विभागला जाईल.अशा परिस्थितीत गांधीजींच्या विचारानुसार लघु उद्योग व कुटीर उद्योग यांना प्रोत्साहन व संरक्षण[३] दिले तरच राजकीय आत्मनिर्भरता शक्य होईल.

एकविसाव्या शतकात राजकारण व धर्म एक दुसऱ्यांशी पूरक बनले आहेत. धर्माच्या नावाखाली अनेक गोष्टी केल्या जात आहेत. मंदिर आणि मस्जिदच्या नावाखाली एकमेकांविरुद्ध धार्मिक, जातीय दंगली व हिंसाचार केला जात आहे. अशा परिस्थितीत सांस्कृतिक एकरूपता कमी होत चालली आहे. ही अवस्था अशीच सुरु राहिली तर देशाचे लहान-लहान तुकडे होतील. अशा लहान-लहान तुकड्यांत देश विभागला जाईल. अशा परिस्थितीत

राज्याची एकता आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी गांधीजींच्या विचारांच्या अनुरूप धर्माचे पृथ्थकरण होणे आवश्यक आहे.[४]तरच गांधींच्या स्वप्नातील अखंड भारत कायम ठेवता येवू शकेल.

गांधीजींनी स्वातंत्र्य पूर्व कालखंडात उपोषण या तंत्राच्या आधारे विधायक मागण्या मान्य करून घेण्यासाठी सत्याग्रहाचा उपयोग केला.उदा. अस्पृश्यता निर्मूलन, हिंदू-मुस्लिम ऐक्य, पाकिस्तानची निर्मिती, मिठाचा सत्याग्रह इत्यादीसाठी उपोषण केले.गांधीजींच्या आंदोलनाला जनतेचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा होता.परंतु वर्तमान परिस्थितीत बंद, हरताळ, आंदोलन, उपोषण इत्यादी स्वहितासाठी करण्यात येत आहेत.यासाठी लोक हिंसेचा वापर करीत आहेत. उदा. एस. टी. बस जाळणे, रस्त्यावरील दिवे फोडणे, सार्वजनिक संपत्तीचा नाश करणे त्यामुळे देशाच्या संपत्तीचे करोडो रुपयांचे नुकसान होत आहे.बेरोजगारी वाढत आहे.सुप्रीम कोर्टाने काम नाही तर पगार नाही असा निर्णय दिला असतांनाही संप हरताळ आंदोलने इत्यादी मार्गांचा अवलंब चुकीच्या मार्गाने केला जात आहे.त्यामुळे गांधीजींचा सत्याग्रह संबंधीचा विचार आज प्रासंगिक ठरतो.आधुनिक भारताच्या सुधारणे बाबत गांधीजींनी सांगितलेली अहिंसा, ग्रामस्वराज्य, मद्यपान निषेध, लघु व कुटीर उद्योगाचे महत्त्व, राजकीय व्यवस्थेचे गुन्हेगारीकारण, सत्याग्रहाचा गैरवापर अशा परिस्थितीत गांधीजींचा विचार उद्याच्या नव्या पिढीला दिशादर्शक ठरू शकतो.वर्तमान समाजात आर्थिक राजकीय क्षेत्रात कोणतेच क्षेत्र असे नाही की ज्यामध्ये गांधीजी विचार प्रासंगिक नाहीत. गांधीजींचे विचार स्वराज्य, रामराज्याकडे घेऊन जाणारे आहेत.[५] त्यामुळेच आजच्या पिढीला गांधीजींचे सिद्धांत व तत्वविचारांची अधीक गरज आहे.

आपल्या स्वराज्याच्या संकल्पनेत गांधींजींनी ग्राम हा घटक महत्त्वाचा मानून गावातील सत्ता तेथील लोकांच्या माध्यमातून ग्रामपंचायतीच्या मार्फत चालविली पाहिजे. सत्तेचा उपयोग समाजाच्या कल्याणासाठी व सेवेसाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते.स्वराज्यात गावांनी जिल्ह्याची प्रशासन व्यवस्था व जिल्ह्यांनी प्रांताची आणि प्रांतांनी केंद्रांची शासन व्यवस्था निवडावी व खेड्यांना जास्तीत जास्त अधिकार असतील. या राज्यव्यवस्थेत मतदान करण्याचा अधिकार सर्वांना असेल, मतदान करताना प्रलोभणे व हिंसक मार्गाचा अवलंब करता कामा नये व चारित्र्यवान, गुणसंपन्न, प्रामाणिक व्यक्तीच गावाचा राज्यकारभार करतील व प्रत्येक व्यक्ती जबाबदारीने वागेल व स्वतःचे हित साध्य करेल असेगांधीजींचे स्पष्ट मत होते.गांधीजींच्या या विचारांचा भारतीय राज्यघटनेत अंतर्भाव करण्यात आला व पुढे ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे गावांसाठीची पंचायतराज व्यवस्था अस्तित्वात आली.

गांधींजींनी स्वातंत्र्यानंतर आपल्या स्वराज्याच्या विचारातून जे स्वप्न पाहिले होते, त्यात त्यांनी खेळावर भर दिला.कारण खेड्याचे चित्र भयावह आहे.रोगराई, उद्योगांची कमतरता, आरोग्याचे प्रश्न, बेकारी, कर्जबाजारीपणा, नशाबाजी, अंधश्रद्धा, अस्पृशता यामुळे खेड्यांचे चित्र वाईट बदले आहे. म्हणून आपल्या विचारात खेड्याकडे लक्ष दिले आणि हे स्वराज्य टिकविण्यासाठी लघुउद्योगांना चालना, शाळा, ग्रंथालय, स्वच्छता गृहे, सहकार चळवळ, सामूहिक शेती, स्वदेशीचा वापर हा उपाय सांगून स्वराज्य संकल्पनेत खेडे हाच देशाचा पाठीचा कणा आहे अशी भावना विशद केली. गांधीजींनी जी स्वराज्याची संकल्पना मांडली ती स्वातंत्र्याच्या नंतर प्रत्यक्षात येऊ शकली नाही. कारण लोक राजकीय स्वराज्यालाच स्वातंत्र्य म्हणू लागली. यातून शासन व्यवस्था बदलली परंतु भारतीय समाजाची पारतंत्र्यातून मुक्तता मात्र झाली नाही. स्वातंत्र्यानंतर जी शासनव्यवस्था देशात निर्माण झाली ती मूठभर लोकांच्या हिताचीच बनली. या लोकशाहीत बहुमताचे शासन असल्यामुळे अल्पसंख्याकांना स्थान नाही. शासनव्यवस्थेचे ग्रामीण भागाकडे विशेष म्हणजे खेड्याकडे दुर्लक्ष झाले. खेड्यामध्ये अजूनही पक्के रस्ते, वीज, पाणी, दारिद्र्य, बेकारी निर्मूलन झाले नाही. याचा परिणाम म्हणून ग्रामीण भागातील शेतकरी आजही आत्महत्या करताना दिसून येत आहे.या बरोबरच ग्रामीण भागातील आरोग्य, जातीयता, भीषण वळणावर पोहोचली असून शासनाचे याकडे दुर्लक्ष झाले आहे. म्हणून लोक आजही पारतंत्र्यात असल्यासारखे जीवन जगत आहेत.

गांधींमुळे अहिंसेच्या कल्पनेला विशेष दर्जा प्राप्त झाला. त्यावर त्यांनी केवळ सिद्धांतच मांडला नाही, तर त्यांनी अहिंसा हे तत्त्वज्ञान आणि आदर्श जीवनपद्धती म्हणून स्वीकारले. अहिंसेचे तत्त्वज्ञान हे दुर्बलांचे शस्त्र नाही, हे त्यांनी आम्हाला समजावले; हे एक शस्त्र आहे, जे प्रत्येकजण वापरून पाहू शकतो. यावर त्यांचा ठाम विश्वास होता. गांधींच्या दृष्टीने अहिंसा ही मानवजातीची सर्वात मोठी शक्ती आहे. ते कोणत्याही सामूहिक संहारक शस्त्रापेक्षा

शक्तिशाली आहे. ते क्रूर शक्तीपेक्षा श्रेष्ठ आहे. गांधींची अहिंसा ही सत्याचा शोध आहे. गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वज्ञानात सत्य हा सर्वात मूलभूत पैलू आहे. त्यांचे संपूर्ण आयुष्य 'सत्याचे प्रयोग' असेच राहिले आहे. सत्याच्या शोधात असतानाच गांधींना अहिंसेचा शोध लागला, ज्याचे त्यांनी पुढे त्यांच्या आत्मचरित्रात स्पष्टीकरण दिले आहे की, अहिंसा हा सत्याच्या शोधाचा आधार आहे. हा शोध जोपर्यंत अहिंसेवर स्थापित होत नाही तोपर्यंत तो व्यर्थ आहे.गांधीजींनी अहिंसात्मक आंदोलनाद्वारे भारताच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्न केले.गांधीजी सतत अहिंसात्मक समाजाच्या बांधणीविषयी बोलत होते.[६]परंतु त्यांना अभिप्रेत असलेले स्वराज्य प्राप्त होऊ शकले नाही.कारण हे स्वातंत्र्य केवळ राजकीय स्वराज्य ठरते.म्हणून या निमित्ताने सर्वजण संकल्प करून गांधींच्या स्वप्नातील भारत निर्माण करणे व देशाची प्रगती घडवून आणणे सध्याच्या काळाची गरज आहे व तशी चळवळ निर्माण करणे हे सर्व समाजाच्या व मानव जातीच्या कल्याणासाठी महत्त्वाचे ठरते.सत्याग्रह हा प्रत्यक्ष कृतीचा, गांधीजींच्या मते, सर्वात प्रभावी मार्ग आहे. त्यांची सत्याग्रह कल्पना ही अतिशय अभिनव स्वरुपाची कल्पना असून गांधीजींनी विश्वविचाराला दिलेली ती अभिजात देणगी आहे.[७]गांधीजींना सत्याग्रहाच्या माध्यमातून नवीन सामाजिक रचना निर्माण करावयाची नव्हती तर मानवाचे एक नवे रूप समाजात प्रस्थापित करावयाचे होते. सर्व प्रकारची शांततापूर्ण साधने असफल झाल्यानंतरच सत्याग्रहाचा वापर करावा असे ते मानत. समाजात प्रत्येक प्रकारचा अन्याय, अत्याचार, भेदभाव, हिंसाचार तेव्हाच निर्माण होतो, जेव्हा सत्याची, न्यायाची उपेक्षा होते. अशा प्रसंगी शक्तीचा वापर केला तर संघर्ष- हिंसाचार होतो म्हणून शांततेच्या मार्गाने सत्याग्रह करून अन्याय दूर करण्याची धडपड करावी. ही धडपड यशस्वी होईलच याची गांधीजींना खात्री होती. कारण प्रत्येक माणसात असलेल्या न्याय-सत्याच्या भावनेला त्यांनी जाणले होते. समाजात संघर्ष, रक्तपात, हिंसाचार न होता न्याय मिळवण्यासाठी लोकांना सत्याग्रहाचा प्रभावी, परिणामकारक नव्हे तर समाज परिवर्तन करण्याचा मार्ग दाखविला आहे.[८]

अशाप्रकारे गांधीजींनी सत्याग्रह, सत्ता विकेंद्रीकरण व स्वराज्य संकल्पनेतून ग्रामांची पुनर्रचना संदर्भात भारताच्या एकात्म स्वरूपासाठी केलेल्या प्रयत्नांचे वस्तुनिष्ठ चित्र स्पष्ट होते.धर्म, जाती, वंश, प्रादेशिकता, भाषा व संस्कृतीच्या आधारे काही असंतुष्ट व अतिरेकी समाजकंटक भारताच्या एकात्म स्वरूपाला तडे देण्याचे प्रयत्न करतात. तेव्हा गांधीजींनी मांडलेल्या व कृतीतून साकारलेल्या 'सर्वधर्म समभाव', 'ईश्वर अल्ला तेरो नाम, सबको सनमती दे भगवान', 'सत्याग्रह', 'अहिंसा' आधी अनेक सिद्धांत भारताच्या मजबूत एकात्मतेसाठी गरजेचे व उपयुक्त सिद्ध होतात.

**संदर्भसूची** :

१. भोळे भा. ल., 'आधुनिक भारतातील राजकीय विचार', पिंपाळापुरे अँड कं. पब्लिशर्स,नागपूर, २००३ पृ. ४७५.
२. जैन पुखराज, फडिया बी. एल., भारतीय शासन एवं राजनीति, साहित्य भवन, आगरा, २०१२ पृ. ६२८.
३. सुरळकर आर.जी., 'आधुनिक भारताचे सुधारणेबाबत गांधीजींचे टीकात्मक धोरण' रेलेव्हंस ऑफ हिंद स्वराज टुडे, एच. एन. सिन्हा महा., पातुर अकोला, २०१० पृ. ४१.
४. उपरोक्त.
५. वाघमारे माधव, ' महात्मा गांधीजींची स्वराज्याची संकल्पना', रेलेव्हंस ऑफ हिंद स्वराज टुडे,एच. एन. सिन्हा महा., पातुरअकोला, २०१० पृ.४८.
६. जेना एस. सी., 'रेलेव्हंस ऑफ गांधीयन फिलॉसोफी इन द पोस्ट-ग्लोबल सोसायटी', जर्नल ऑफ गांधीयन स्टडीज पृ. १७०.
७.भोळे भा. ल., 'आधुनिक भारतातील राजकीय विचार', पिंपाळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २००३ पृ. ४७६.
८. खडसे मोहन विष्णू, 'महात्मा गांधीचे सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान',रेलेव्हंस ऑफ हिंद स्वराज टुडे,एच. एन. सिन्हा महा., पातुर अकोला, २०१० पृ.९४.